**तातडीचे**

क्र. पोमसं/२/१०२०/नि.सु.बि.सं.(अभियांत्रिकी)/१६-१७/ ५०/२०१७ मुंबई, दि. :- १२ /१०/२०१७.

विषय :- पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत महसुली विभाग वाटप पसंतीक्रम सादर करण्याबाबत.

* * * * *

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर नियमित / तदर्थ पदोन्नतीने पदस्थापना देण्याकरिता शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०१७/प्र. क्र. ११४/कार्या-१२, दि. १५/०६/२०१७ नुसार पदोन्नतीच्या विचारकक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांकडून विहित नमूना-ब मधील पसंतीक्रम घेणे आवश्यक आहे.

२. तरी, घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी खालील नमूद त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांचे विहित प्रपत्र-२ मधील बंधपत्र घेऊन दि. १८/१०/२०१७ पर्यंत या कार्यालयास पाठवावे.

| अ. क्र. | पोलीस निरीक्षकांचे नांव | प्रवर्ग | सध्याची नेमणूक |
|---|---|---|---|
| १. | राजेश्वर भास्करराव घारोटे | खुला | बृहन्मुंबई |
| २. | संजय तानाजी हांडे | खुला | पोलीस बिनतारी संदेश, पुणे |
| ३. | बाळासाहेब किसन घोडेकर | भज-ब | ठाणे ग्रामीण |
| ४. | अरविंद धोंडिबा अल्हाट | अ.जा. | लोहमार्ग पुणे |

३. महसुल संवर्गनिहाय रिक्त पदांचा तक्ता सोबत जोडला आहे. ती रिक्त पदांची संख्या सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

( राजकुमार व्हटकर )
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण / लोहमार्ग पुणे.

प्रत :- पोलीस उप अधीक्षक, संगणक विभाग,

**प्रपत्र-१**

**विभागीय महसुल संवर्गनिहाय पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) रिक्त पदांची सद्य:स्थिती.**

| अ.क्र. | विभागीय संवर्ग | रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | **नागपूर** | ० |
| २. | **अमरावती** | ० |
| ३. | **औरंगाबाद** | ० |
| ४. | **कोंकण विभागाचा भाग असलेला कोंकण-१**<br>(पोलीस उपअधीक्षक, (गुप्तवार्ता विश्लेषण तांत्रिक), बृहन्मुंबई) | १ |
| ५. | **नाशिक** | ० |
| ६. | **कोंकण विभागाचा भाग असलेला कोंकण-२** | ० |
| ७. | **पुणे**<br>[सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उपअधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / पोलीस उपअधीक्षक, बिनतारी संदेश, पुणे / पोलीस उपअधीक्षक, बिनतारी संदेश, कोल्हापूर परिक्षेत्र) | ३ |
| | **एकूण रिक्त पदे** | ४ |

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-०२१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२, दिनांक २८/०४/२०१५, १६/०७/२०१५, व १५/०६/२०१७.

## नमुना "प्रपत्र-२" बंधपत्र (पदोन्नतीने नियुक्तीसंदर्भात)

मी, श्री. / श्रीमती ______________________________ याद्वारे असे लिहुन देतो / देते की, माझा पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीसाठीच्या सन २०१६-१७ च्या निवडसूचीत / तदर्थ पदोन्नतीसूचीत समावेश होण्याची शक्यता असल्याचे मला दिनांक १२/१०/२०१७ च्या ज्ञापांन्वये कळविले आहे. पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर माझ्या पदोन्नतीने नियुक्तीसाठी (१) महसुल विभाग वाटप नियम, २०१५ (२) महसुल विभाग वाटप (सुधारणा) नियम-२०१५ व (३) महसुल विभाग वाटप (दुसरी सुधारणा) नियम-२०१७ लागू असून पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर माझ्या पदोन्नतीने नियुक्तीसाठी माझी पहिली पसंती ______________ या विभागीय संवर्गासाठी देत आहे. (१) **नागपूर,** (२) **अमरावती,** (३) **औरंगाबाद,** (४) **कोंकण-१** (५) **नाशिक,** (६) **कोंकण-२,** (७) **पुणे** यापैकी कोणत्याही एकाच महसुली विभागाची पसंती देण्यात यावी).

**३)** मागणी केलेल्या संवर्गातील खालील घटकांपैकी एका ठिकाणी नियुक्ती होणेस विनंती आहे.

iv) _______

v) _______

vi) _______

**४)** महसुली विभाग वाटप (दुसरी सुधारणा) नियम-२०१७ मधील नियम-६ अन्वये खालील प्रकरणे वगळण्यात आली आहेत:-

५. जे अधिकारी स्वत: अपंग आहेत.

६. ज्या अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्याचे मुल मतीमंद आहे; किंवा ज्या अधिकाऱ्यांनी मंतीमंद असलेल्या स्वत:च्या भावाचे किंवा बहिणीचे पालकत्व स्वीकारलेले आहे.

७. ज्या स्त्री अधिकारी विधवा किंवा परित्यक्त्या आहेत.

८. विभागीय पदोन्नती समितीने ज्या तारखेस पदोन्नतीस पात्र असल्याची शिफारस केली असेल, त्या तारखेस ज्या अधिकाऱ्यास सेवानिवृत्तीस ०३ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधी शिल्लक आहे.

उपरोक्त प्रकरणांपैकी अ.क्र.(___) वरील प्रकरण मला लागू होत आहे. (त्याबाबतचे प्रमाणपत्र / कागदपत्र जोडावे).

ठिकाण :- ____________ सही:-____________

दिनांक :- ____________ नांव :- ____________